# पदभरती जाहिरात

## राष्ट्रीय आरोग्य अभियान,

## जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी, जिल्हा परिषद, नांदेड

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत जिल्हयात राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमातील जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी नांदेड अंतर्गत खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे २९ जुन २०२४ पर्यंत करीता खाली नमुद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहुन कंत्राटी पध्दतीने / करार तत्वावर रिक्त असलेल्या खालील नमुद पदांची पदभरती करण्याचे आयोजित केले आहे. तरी रिक्त तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | पदनाम | शैक्षणिक अर्हता | अनुभव | एकत्रीत मानधन प्रति महिना | रिक्त पदांचा संवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| 1 | GNM / LHV (Female) **(Total Post)- 38** | GNM | -- | 20,000/- | SC-4<br>ST – 3<br>VJ – 1<br>NT C – 1<br>NT D – 2<br>SBC- 2<br>OBC – 10<br>EWS – 3<br>Open - 12<br>**Total – 38** |
| | GNM (Male) **(Total Post) -2** | | | | For Male Candidate<br>**OBC -1**<br>**Open – 1**<br>**Total - 2** |
| 2 | Audiologist -1 | Degree in Audiology | -- | 25000/- | SC – 1 |
| 3 | Social Worker – 1 | MSW with 2 years Relevant exp | -- | 28000/- | Open - 1 |
| 4 | Psychologist | 1. Having a recognized qualification in clinical psychology from an institution approved and recognized, by the rehabilitation council of India, constituted under section 3 of the rehabilitation council of India act 1992.<br>**OR**<br>2. Having post graduate degree in psychology or applied psychology and a master of philosophy in clinical psychology or medical & social psychology obtain after completion of full time cause of 2 years which includes supervised clinical training from any university recognized by the university grants. Commission established under the university grants commission act 1956 & approved & recognized by the rehabilitation council of India act 1992 or such recognized qualification as may be prescribed. | 3 Years relevant Experience | 30000/- | VJ - 1 |
| 5 | Optometrist -1 | B.Sc in Optometry - 2 years Relevant exp | -- | 20000/- | Open – 1 |
| 6 | Medical Officer (Male) -2 | BAMS | | 28000/- | NT C -1<br>OBC – 1<br>**Total – 2** |
| 7 | Medical Officer -1 | BUMS | | 28000/- | SC -1 |

**अटी व शर्ती–**

- ➢ सदर पदांची नियुक्ती ही निव्वळ कंत्राटी स्वरुपाची असुन २९ जुन २०२४ पर्यंतच्या कालवधी करीता असेल,
- ➢ केंद्र शासनाने अथवा राज्यशासनाने संबंधित पद नामंजुर केल्यास संबंधितास कोणतीही पुर्वसुचना न देता उमेदवारांची सेवा समाप्त करण्यात येईल.

- अ.क्र. ७ वरील पदाकरीता एससी प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास खुल्या प्रवर्गातील उमेदवारास संधी देण्यात येईल.
- सर्व पदांचे वेतन हे एकत्रित मानधनावर आहेत.
- उमेदवारांची गुणानुक्रमे छाननी करुन त्यातील पात्र उमेदवारांना, पात्र ठरविण्यात येईल तसेच ज्या पदाकरीता कौशल्य चाचणी लागू आहे अशा पदांची कौशल्य चाचणी घेण्यात येईल.
- **वयोमर्यादा** – जाहिरातीच्या दिवशी वैद्यकिय अधिकारी या पदाकरिता सेवा प्रवेशाची वयोमर्यादा **६१ वर्ष** राहील.
- स्टाफ नर्स या पदाच्या भरतीसाठी कमाल वयोमर्यादा ५९ वर्षे राहील. स्टाफ नर्स पदाकरीता ज्या आशा स्वंयसेविकांनी जीएनएम चा कोर्स पुर्ण केलेला आहे त्यांना जीएनएम पदभरतीमध्ये वयाची अट राहणार नाही, असे जाहिरातीमध्ये नमुद करावे अशा सुचना दिलेल्या आहेत.
- तसेच उर्वरीत सर्व पदांसाठी सेवा प्रवेशाची कमाल वयोमर्यादा खुलया प्रवर्गासाठी ३८ व राखीव प्रवर्गासाठी ४३ अशी ठेवण्यात यावी तसेच सदर पदांकरीता राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांना ५ वर्ष वयोमर्यादा शिथीलता राहील.
- ६० वर्षावरील अर्जदारांकरिता जिल्हा शल्य चिकीत्सक प्रमाणित शारिरीक योग्यता (Physical Fitness) प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.
- ज्या आशा स्वंयसेविकांनी जी.एन.एम. चा कोर्स केलेला असेल त्यांना वयाची अट राहणार नाही व त्यांना भरती प्रक्रियेत प्राधान्य देण्यात येईल. तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सन २००९ ते २०१२ या आर्थिक वर्षात शैक्षणिक कर्ज घेतलेले आहे अशा उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल.
- अर्जदारांनी सोबत दिलेल्या नमुन्यात अर्ज करावा.
- विवाहीत उमेदवारांना सोबत देण्यात आलेल्या नमुन्यात लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र देणे आवश्यक आहे.
- जाहिरातीत नमुद पदांची संख्या व मानधन कमी अथवा जास्त होऊ शकते तसेच सदरची भरती रद्द करणे/स्थगीत करणे , निवड /नियुक्ती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता बदल अथवा रद्द करणे, निवड प्रक्रिया संबंधी कोणतेही निर्णय घेण्याचे अधिकार निवड समितीकडे राखुन ठेवण्यात आलेले आहेत, निवड झालेल्या कोणत्याही उमेदवारांची नियुक्ती सेवा कालावधीत रद्द करण्याचा अथवा चालु ठेवण्याचा अंतिम अधिकार निवड समिती अध्यक्ष यांचेकडे राखुन ठेवला आहे. याबाबत कोणालाही कोणताही दावा करता येणार नाही.
- प्रत्येक पदाकरिता उमेदवारांनी स्वतंत्र अर्ज सादर करणे अनिवार्य आहे. ज्या पदाकरिता अर्ज सादर केला आहे त्याच पदाकरिता ग्राहय धरण्यात येईल.
- खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकरीता रु.१५०/- व राखीव प्रवर्गातील उमेदवारांकरीता रु.१००/- चा डिमांड ड्राफ्ट (डि.डी.) जोडणे आवश्यक आहे. डिमांड ड्राफ्टच्या मागे स्वतःचे नाव लिहावे. डिमांड ड्राफ्ट कोणत्याही बॅंकेचा District Integrated Health & Family Welfare Society Nanded किंवा **D.I.H.&F.W.S. Nanded** या नावे देय असावा. चुकीच्या नावे डि.डी. असल्यास अथवा विहित मुदतीचा नसल्यास उमेदवारास अपात्र करण्यात येईल. केवळ डि.डी स्वीकारल्या जाईल.
- शैक्षणिक पात्रता पुर्ण करीत नसलेल्या उमेदवारांना अपात्र ठरविण्यात येईल.
- स्टाफ नर्स, वैद्यकिय अधिकारी (बिएएमएस, बियुएमएस) या पदाकरीता कौशल्य चाचणी घेण्यात येणार असुन सदर पदांकरीता गुणानुक्रमे पात्र उमेदवारांना कौशल्य चाचणीसाठी १:५ प्रमाणे बोलावण्यात येईल
- आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता, पात्रता, अनुभव व आरक्षीत उमेदवारांनी जातीचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांना अपात्र ठरविण्यात येईल.
- **सदर भरती करीता ईच्छुक उमेदवारांनी विनंती अर्ज A-४ साईजच्या कागदावर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांचे नावाने सादर करावा. अर्जासोबत खालील प्रमाणे सत्यप्रती Self Attested करुन जोडाव्यात.**
  १. अर्जामध्ये ठळक अक्षरात स्वतःचे संपुर्ण नाव, पदाचे नाव, कायमस्वरुपी राहत असलेला पत्ता, दुरध्वनी व भ्रमणध्वनी क्रमांक, जन्मतारीख, **शैक्षणिक अर्हतेचे सर्व तपशील** – अभ्यासक्रमाचे नाव, संस्थांचे विद्यापिठाचे नाव, उत्तीर्ण झालेले वर्ष, अंतिम वर्षाच्या सर्व गुणपत्रीका, **उच्च शैक्षणिक अर्हता** – संबंधित विषयामध्येच उच्च शैक्षणिक अर्हता असल्यास गाहय धरण्यात येईल. **कामाचा अनुभव**- गुण देणे करीता अनुभव हा केवळ शासकिय, निमशासकिय, राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत असल्यास ग्राहय धरण्यात येईल तसेच कामाचा अनुभव हा संबंधित विषयामध्ये असल्यास गाहय धरण्यात येईल,

  काम केलेल्या संस्था/ रुग्णालयाचे नाव, ज्यापदावर काम केले आहे त्या पदाचे नाव, कालावधी, पदाची जबाबदारी व मानधन/वेतन, तसेच इतर सर्व माहिती नमुद करावी.

  २. अर्जासोबत सत्यप्रतीमध्ये असलेले दहावी पासुनचे सर्व गुणपत्रीका व प्रमाणपत्र, शाळेचा दाखला, आधार कार्ड, पासपोर्ट आकाराचा १ फोटो, राखीव प्रवर्गातील असल्यास जातीचे प्रमाणपत्र किंवा जात वैद्यता प्रमाणपत्र तसेच इतर तांत्रिक ज्ञान असलेले सर्व कागदपत्रे जोडावित.

  ३. अ.क्र.१, ६ व ७ या पदाकरीता अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी संबंधित कौन्सिलकडे नोंदणी केलेले अद्यावत प्रमाणपत्र अथवा पावतीची सत्यप्रत अर्जासोबत जोडणे अनिवार्य आहे.

  ४. Provisional Registration असणाऱ्या अथवा नोंदणी प्रमाणपत्र सादर न करणाऱ्या उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

- करार पध्दतीने नेमणुका करावयाच्या असल्याने एकत्रित मानधना शिवाय अन्य कोणताही भत्ता वगैरे लागु नाही. तसेच कौशल्य चाचणी करीता येणाऱ्या उमेदवारास कोणताही भत्ता देय राहणार नाही.
- अ.क्र.१, ६ व ७ करीता शासकिय सेवेतुन सेवानिवृत्त/स्वेच्छा सेवानिवृत्ती कर्मचारी अर्ज करित असल्यास त्यांनी शासकिय सेवेत रुजु झाल्याच्या दिनांक, कार्यकाळ, पदनाम, सेवा निवृत्त झालेले वर्ष, सेवानिवृत्तीच्या दिनांकास मिळालेले अंतिम वेतन व सेवा निवृत्ती नंतर देय असलेले वेतन (पेन्शन) आणि यापूर्वी कंत्राटी पध्दतीने कोणत्याही कार्यक्रमात काम केले असल्यास त्याबाबतची सर्व माहिती अर्जामध्ये नमूद करावी आणि त्याच्या सत्यप्रती अर्जासोबत जोडाव्यात.
- सेवानिवृत्त कर्मचाऱ्याची निवड झाल्यास त्यांचे मानधन राज्यस्तरावरुन प्राप्त मार्गदर्शक सुचनेनुसार मोजमाप करुन अदा करण्यात येईल.
- सेवानिवृत्त कर्मचाऱ्याची निवड झाल्यास त्यांच्या सेवा काळामध्ये अथवा सेवानिवृत्तीनंतर कोणत्याही स्वरुपात चौकशी अथवा प्रकरण पलंबित नसल्याचबाबतचे ना हरकत प्रमाणपत्र उपलब्ध करुन देण्याकरिता मा.आयुक्त, आरोग्य सेवा मुंबई यांच्याकडे प्रस्ताव पाठविण्यात येईल सदर प्रस्तावास मंजुरी प्राप्त झालयानंतरच संबंधितास नियुक्ती आदेश निर्गमीत करण्यात येतील. तसेच रुजु होण्याकरिता त्यांना जिल्हा शल्य चिकीत्सक, जिल्हा रुग्णालय, नांदेड यांचे शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असलयाबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.
- निवड झालेल्या उमेदवारांने आपली सेवा कंत्राटी पध्दतीने एकत्रित मानधनावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात असल्याबाबत रु. १००/- च्या बॉन्ड पेपरवर विहीत नमुन्यात करारनामा देणे बंधनकारक आहे.
- निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र/अयशस्वी ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.
- ज्या पदाकरीता कौशल्य चाचणी लागू आहे अशा पात्र उमेदवारांनी त्यांना दिलेल्या वेळेत उपस्थीत न राहील्यास संबंधितास अपात्र ठरविण्यात येईल.
- सदर जाहिरात, भरती प्रक्रियेसंबंधी आवश्यक सुचना, पात्र/अपात्र यादी तसेच निवड यादी प्रसिध्द करणे, हरकती/आक्षेप प्राप्त करुन घेणे, इ. बाबत सविस्तर तपशिल वेळोवेळी राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय, जिल्हा परिषद नांदेड येथे व www.zpnanded.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.
- उमेदवाराने अर्ज **दि.२८/०६/२०२१ रोजी सायं. ५:३० पर्यंत** कार्यालयीन वेळेत (शासकिय सुट्टया वगळुन) राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय आरोग्य विभाग जिल्हा परिषद नांदेड येथे स्वतः/पोस्टाने/कुरिअर दुवारे पोहोचतील अशा बेताने पाठवावेत. तद्नंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.
- अर्ज सादर करते वेळी अथवा पोस्टाने/कुरीअरद्वारे पाठवतेवेळी **लिफाफ्यावर** स्वतःचे पुर्ण नाव, पत्ता, अर्ज ज्या पदाकरीता करीत आहेत त्या पदाचे नाव तसेच ज्या जात प्रवर्गातुन अर्ज करीत आहेत त्याचा प्रवर्ग स्पष्ट नमुद करावा.
- उमेदवारांनी कुठल्याही प्रकारचा खाजगी किंवा राजकीय दबाव आणल्यास संबंधितावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.
- चुकीची अथवा खोटी माहिती दिल्यास संबंधिताची निवड कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल. तसेच संबंधितावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.
- कोविड-१९ साथरोग परिस्थितीस अनुसरुन शासनाने ठरवुन दिलेल्या नियमांचे तंतोतंत पालन करावे.

स्वाक्षरीत/-
अध्यक्ष, निवड समिती तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नांदेड.

# राष्ट्रीय आरोग्य अभियान, नांदेड

अर्जाचा नमुना

.................................या पदाकरीता अर्ज.

पासपोर्ट आकाराचा उमेदवाराचा नजिकचा साक्षांकित करुन फोटो लावावा

प्रति,
मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद नांदेड

**संपूर्ण नाव** **आडनाव** **स्वतःचे नाव** **वडीलांचे/पतीचे नाव**

मराठी ........................ .......................... ..............................

इंग्रजी ........................ .......................... ..............................

१) पत्र व्यवहाराचा संपुर्ण पत्ता ..........................................................................

..........................................................................................................

२) कायमचा पुर्ण पत्ता ..............................................................................

..........................................................................................................

३) भ्रमणध्वनी क्रमांक १. .................................. २. ..........................................

ई मेल आयडी ........................................................

४) जन्म तारीख:- / / दि.२२/०६/२०२३ रोजीचे वय....... (वर्ष....... महिने......दिवस.....)

५) **अर्जदाराकडे रहिवाशी प्रमाणपत्र आहे :-** होय / नाही

६) **अर्जदाराकडे जातीचे प्रमाणपत्र आहे:-** होय / नाही अर्ज सादर करीत असलेल्या जातीचा **प्रवर्ग**:-..........

जात :-..........................

मुळ जातीचा प्रवर्ग :-..........................

**(नमुद करणे अनिवार्य आहे)**

७) **अर्जदार विवाहित आहे किंवा नाही (✓ टिक करावे) :-** विवाहीत / अविवाहीत

८) **शैक्षणिक अर्हता-**

| अ. क्र | उत्तीर्ण केलेली परिक्षा | बोर्ड/विद्यापीठाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | प्राप्त गुण | किती पैकी | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |
| ४ | | | | | | |
| ५ | | | | | | |

९) अनुभव :-

| अ.क्र. | धारण केलेले पद | काम केलेल्या संस्थेचे नाव व पत्ता | काम केलेल्या कालावधीची दिनांक नमुद करावी | | एकुण वर्ष | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पासुन | पर्यंत | वर्ष | महिने | दिवस |
| १ | | | | | | | |
| २ | | | | | | | |
| ३ | | | | | | | |
| ४ | | | | | | | |

१०) आपणाविरुध्द न्यायप्रविष्ठ प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगाविषयक प्रकरण वा तत्सम इत्यादी कार्यवाही चालू आहे काय ? असल्यास थोडक्यात तपशिल द्यावा.

| होय | नाही | असल्यास |
|---|---|---|
| | | |

११) डि.डी.:-

बॅंकेचे नाव व शाखा ..........................................................................

डि.डी. चा क्रमांक ..................................... दिनांक .......................

१२) अर्जासोबत खालील (छायांकित) सत्यप्रती जोडल्या आहेत.

१) .......................................... २) ..................................

३)........................................... ४) ..................................

५)........................................... ६) .....................................

७)........................................... ८) .....................................

१३) अर्जदार महाराष्ट्राचा रहिवासी आहे काय? होय/नाही.

वर नमुद केलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे. यापदासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता मी धारण करीत आहे. याची खात्री करुनच हा अर्ज मी करीत आहे. मी असेही प्रमाणीत करतो /करते की, वर दिलेली माहिति खोटी अगर चुकीची आढळल्यास त्याकारणावरुन मी नौकरी गमावल्यास व त्याअनुषंगाने माझ्या विरुध्द होणाऱ्या सर्व कायदेशीर कार्यवाहीस मी पात्र बांधील राहील व त्याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही. तसेच जाहिरातीत नमुद केलेल्या सर्व अटी व शर्ती मी वाचल्या असुन त्या मला मान्य आहेत.

ठिकाण:-

दिनांक:-

स्वाक्षरी..............................

नाव ................................

.......................................

# प्रतिज्ञापत्र

## नमुना अ

मी.श्री./श्रीमती/कुमारी ..........................................................

श्री............................................................ यांचा/यांची
मुलगा/मुलगी/पत्नी वय......... वर्ष, राहणार.................................................
.................................................... याद्वारे असे जाहीर करतो/करते की,

१) मी..................................................... या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२) आज रोजी मला ................. (संख्या) इतकी हयात मुले आहेत, त्यापैकी दिनांक २३ जुलै २०२० यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या.............. आहे.

(असल्यास जन्मदिनांक नमूद करावा)

३) दिनांक २३ जुलै , २०२० रोजी हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २३ जुलै २०२० व तदूनंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :-

सही/-

.........................

दिनांक:-